# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 12 February 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १२ फेब्रुवारी २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या भूमिकेला दिलेल्या पाठिंब्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून मार्सेलिसच्या जनतेप्रति कृतज्ञता व्यक्त
- राज्यात मत्स्योत्पादन वृद्धीसाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात प्रायोगिक तत्वावर प्रशिक्षण कार्यक्रम
- शिक्षण आणि जीवन व्यवहारांत समन्वयाची आवश्यकता–राज्यपाल तथा कुलपती सी पी राधाकृष्णन यांचं प्रतिपादन

आणि

- तिसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात भारताकडून इंग्लंडसमोर ३५८ धावांचं लक्ष्य

****

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या भूमिकेला दिलेल्या पाठिंब्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फ्रान्समध्ये मार्सेलिसच्या जनतेप्रति कृतज्ञता व्यक्त केली आहे. ते आज आपल्या फ्रान्स दौऱ्यात मार्सेलिस इथं पोहोचले. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात या ठिकाणाचं मोठं महत्त्व असल्याकडे पंतप्रधानांनी लक्ष वेधलं. स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी आठ जुलै १९२० रोजी जहाजातून उडी मारुन मार्सेलिस बंदर गाठलं होतं. त्यावेळी त्यांना पाठिंबा देणाऱ्या आणि ब्रिटिशांच्या ताब्यात देण्याला विरोध करणाऱ्या फ्रेंच कार्यकर्ते आणि जनतेप्रति त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशातून कृतज्ञता व्यक्त केली आहे.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युअल मॅक्रॉ यांच्या हस्ते आज मार्सेलिस इथं भारताच्या नव्या वाणिज्य दूतावासाचं उद्घाटन करण्यात आलं. त्यानंतर मोदी यांनी मॅक्रॉ यांच्या समवेत मार्सेलिस इथल्या युद्ध हुतात्मा स्मारकाला भेट देऊन, पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धात वीरमरण प्राप्त झालेल्या भारतीय सैनिकांना अभिवादन केलं. पंतप्रधानांच्या मार्सेलिस भेटीबाबत तिथल्या भारतीय समुदायामध्ये उत्साहाचं वातावरण असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमाच्या आजच्या भागात प्रसिद्ध अभिनेत्री दीपिका पदुकोण हिने विद्यार्थ्यांशी संवाद साधला. अपयशाची भीती न बाळगता आपल्या बलस्थानांवर लक्ष केंद्रीत करण्याचं आणि दुबळी बाजू बळकट करण्यासाठी प्रयत्न करण्याचं आवाहन दीपिकाने विद्यार्थ्यांना केलं.

****

टाटा स्मारक केंद्र आणि नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ बायोमेडिकल जीनोमिक्स यांनी, स्तनाच्या कर्करोगाच्या काही रुग्णांकडून हार्मोन उपचारांना प्रतिसाद न मिळण्यामागची जनुकीय कारणं शोधून काढली आहेत. या शोधामुळे अशा रुग्णांसाठीची उपचार योजना ठरवण्यात मदत मिळणार आहे. या शोधात, हार्मोन उपचारांना प्रतिसाद देणाऱ्या आणि प्रतिसाद न देणाऱ्या रुग्णांच्या जीनोमचा तुलनात्मक अभ्यास केल्यानंतर ट्यूमरमधल्या तीन प्रमुख जनुकांमध्ये उत्परिवर्तन आढळलं. हा शोध म्हणजे कर्करोगाच्या वैयक्तिकृत उपचारांमधलं एक महत्त्वाचं मार्गदर्शक पाऊल आहे, असं प्रमुख संशोधक डॉ. निधान बिस्वास यांनी सांगितलं आहे.

****

राज्यात गोड्या पाण्यातलं तसंच समुद्रातलं मत्स्योत्पादन वाढवण्यासाठी मच्छिमारांना प्रशिक्षण देण्याचा निर्णय मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी घेतला आहे. मंत्रालयात आज यासंदर्भात झालेल्या बैठकीत ते बोलत होते. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात प्रायोगिक तत्वावर या प्रशिक्षणाचा कार्यक्रम सुरू करण्याचे तसंच सागरी किनारपट्टीच्या एका जिल्ह्यातही हा प्रशिक्षण कार्यक्रम प्रायोगिक तत्वावर राबवण्याचे निर्देश त्यांनी दिले. या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी जिल्ह्यांच्या नियोजन समितीच्या निधीमधून तरतूद करावी, अशा सूचनाही राणे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. २०२६ पर्यंत कार्यान्वित होणार असलेल्या वाढवण

बंदरासाठी कुशल मनुष्यबळ निर्मितीकरता एक प्रशिक्षण कार्यक्रम आखून तो तातडीनं सुरू करण्याचे निर्देशही राणे यांनी यावेळी दिले.

****

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि रत्नागिरी जिल्ह्यातल्या राजापूर विधानसभा मतदारसंघाचे सलग तीन वेळा आमदार झालेले नेते राजन साळवी यांनी पक्षाच्या उपनेतेपदाचा राजीनामा दिला आहे. काही महिन्यांपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत त्यांचा शिवसेनेच्या किरण सामंतांकडून पराभव झाला होता. या पराभवाची नैतिक जबाबदारी स्वीकारून आपण उपनेतेपदाचा राजीनामा देत असल्याचं त्यांनी पत्रात लिहिलं आहे.

****

गडचिरोली जिल्ह्यात भामरागड तालुक्यातल्या दिरंगी आणि फुलनार गावांजवळच्या जंगलात नक्षलवाद्यांशी लढताना वीरमरण आलेले पोलिस अंमलदार महेश नागुलवार यांना आज गडचिरोली इथल्या पोलिस मुख्यालयाच्या पटांगणावर मानवंदना देण्यात आली.

त्यानंतर संध्याकाळी नागुलवार यांच्या पार्थिवदेहावर अनखोडा या त्यांच्या गावी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागुलवार यांना श्रद्धांजली अर्पण केली असून, नागुलवार यांच्या कुटुंबियांना राज्य सरकारतर्फे दोन कोटी रुपयांचं आर्थिक सहाय्य आणि विविध लाभ देण्याची घोषणा केली आहे.

****

थोर समाज सुधारक दयानंद सरस्वती यांची आज जयंती आहे. समाजाला जागरूक करण्यासाठी, तसंच भारतीय वारसा आणि संस्कृतीच्या संरक्षणासाठी महर्षी दयानंद आयुष्यभर झटत राहिले, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या याबाबतच्या संदेशात म्हटलं आहे.

संत रविदास यांची जयंतीही आज देशभरात साजरी केली जात आहे. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविदास यांना अभिवादन केलं.

बीडमध्ये संत रविदास यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरात सामाजिक एकतेचा संदेश देणारी फेरी तसंच संत रविदास यांच्या मूर्तीची मिरवणूक काढण्यात आली. छत्रपती संभाजीनगर इथंही रविदास यांना अभिवादन करण्यात आलं.

****

शिक्षण आणि जीवन व्यवहारांत समन्वयाची आवश्यकता राज्यपाल तथा कुलपती सी पी राधाकृष्णन यांनी व्यक्त केली आहे. आज सातारा इथं कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचा पहिला दीक्षान्त समारंभ राज्यपालांच्या उपस्थितीत झाला, त्यावेळी ते बोलत होते. शिक्षण आणि व्यवहाराचा हा समन्वय साधण्याच्या दृष्टीने नवीन शैक्षणिक धोरण महत्त्वाचं असल्याचं राज्यपालांनी नमूद केलं. या विद्यापीठाच्या पदवी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सहाशे एकोणऐंशी विद्यार्थ्यांपैकी उत्कृष्ट गुण मिळविलेल्या तीन स्नातकांना राज्यपालांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आली.

****

शुभमन गीलची शतकी खेळी आणि विराट कोहलीपाठोपाठ श्रेयस अय्यरच्या अर्धशतकांच्या बळावर भारतीय क्रिकेट संघानं पाहुण्या इंग्लड संघासमोर ३५७ धावांचं लक्ष्य ठेवलं आहे. तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतला अखेरचा सामना अहमदाबाद इथं सुरू आहे. मालिकेतले पहिले दोन सामने जिंकून भारतानं विजयी आघाडी घेतली आहे.

****

पुण्यातल्या म्हाळुंगे-बालेवाडी इथल्या शिवछत्रपती क्रीडा संकुलातल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा अद्ययावत कराव्यात, असे निर्देश क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले आहेत. आज मंत्रालयात यासंदर्भात झालेल्या बैठकीत भरणे यांनी गणवेशाचा दर्जा, प्रशिक्षकांचं मानधन तसंच भोजन दर याबाबतही सूचना केल्या. कोल्हापूर इथे फुटबॉल क्रीडा प्रबोधिनी सुरू करण्यालाही या बैठकीत तत्वत: मान्यता देण्यात आली.

****

धाराशिव जिल्ह्याच्या कळंब तालुक्यात शेळका धानोरा इथले महादेव विठ्ठल कांबळे यांच्या शेतात एआय अर्थात कृत्रीम बुद्धिमत्तेच्या वापरातून मिरची पिकाचं संगोपन केलं जात आहे. सयाजी ॲग्रो प्रोड्युसर कंपनीने आयसीआयसीआय फाउंडेशनकडून वापरात आणलेल्या या आधुनिक तंत्रज्ञानाचा आढावा घेणारा हा वृत्तांत –

***शेतात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केल्यामुळे पिकांच्या वाढीसाठी जमिनीमध्ये असलेली आर्द्रता, हवामानाचा परिणाम, औषध फवारण्या तसेच पाण्याचे व्यवस्थापन आणि पीक व्यवस्थापन करण्यास मदत होत आहे. यासाठी जमिनीमध्ये वाफे पद्धतीने लावलेल्या मिरच्यांच्या मुळाशी सेंसर लावून ते सेंसर संदेश टॉवर पर्यंत पोहोचतात, हा टॉवर २४ तास कार्यरत राहून संबंधित शेतकऱ्याला त्याच्या मोबाईलवर संदेशाद्वारे अवगत केलं जातं. त्यामुळे पिकांची जोपासना करण्यास आणि शेती उत्पादन वाढण्यास मदत होणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा केलेला हा वापर धाराशिव जिल्ह्यातील पहिलाच पथदर्शी प्रयोग असून इतर शेतकऱ्यांना हा मार्गदर्शक ठरणार आहे.***

***देविदास पाठक, आकाशवाणी वार्ताहर, धाराशिव.***

****

चव्वेचाळीसावं मराठवाडा साहित्य संमेलन येत्या पंधरा आणि सोळा तारखेला आयोजित करण्यात आलं आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात वाळूज इथं दगडोजीराव देशमुख महाविद्यालयात हे संमेलन होणार आहे. या संमेलनाचं अध्यक्षपद डॉ. भीमराव वाघचौरे भूषवणार आहेत.

****

हिंगोली जिल्ह्यातील आखाडा बाळापूर इथले प्रतिष्ठित व्यापारी तथा युवा सामाजिक कार्यकर्ते सचिन विश्वनाथ पेंढारकर यांना या वर्षाचा ‘राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार’ जाहीर करण्यात आला आहे. येत्या नऊ मार्च रोजी हिंगोली इथं हा पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान केला जाणार आहे.

****

परभणी इथं कोठडीत मृत्यू झालेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्या प्रकरणाची चौकशी उच्च न्यायालयाच्या विद्यमान न्यायमूर्तींमार्फत करावी तसंच संबंधित पोलिसांवर हत्येचा गुन्हा दाखल करून त्यांना सेवेतून बडतर्फ करावं, अशी मागणी काँग्रेसच्या अनुसूचित जाती विभागाचे अध्यक्ष सिद्धार्थ हत्तीअंबिरे यांनी केली आहे. ते आज मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते.

****